शोधप्रबंधाचा आराखडा

“ अण्णा भाऊ साठे यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांची प्रासंगीकता ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयाती पीएच. डी. पदवीसाठी सादर करण्यात येणारा शोधप्रबंधाचा संक्षिप्त

आराखडा

विषय :- अर्थशास्त्र

संशोधक

मयुरदिदी दिलीप उफाडे

मार्गदर्शक

डॉ. रत्नाकर रामराव कांबळे

अर्थशास्त्र विभाग, शारदा महाविद्यालय, परभणी .

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्र संकुल ,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड .

जानेवारी -२०२४

१	प्रस्तावना (Introduction)	३
२	अण्णा भाऊ साठे यांचा जीवन परिचय (Introduction to the life of Anna bhau sathe)	४
३	अण्णा भाऊ साठे यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांचा अभ्यास(A study of Economic and Social Thoughts of anna bhau sathe)	५
४	संशोधनाची उद्दिष्टे (Objective of Research)	६
५	संशोधनाची गृहितके (Hypothesis Of Research)	७
६	संशोधनाचे महत्व (Importance of Research)	८
७	संशोधन पद्धती(Research Methodology)	८
८	संशोधन विषयाची मर्यादा व व्याप्ती (Research methodology limitations of research Topic and Scope)	९
९	संशोधन प्रबंधाचा संकल्पित आराखडा (A conceptual outline of a research thesis)	१०
१०	संदर्भसुची (References)	११

प्रस्तावना(Introduction) -

“अण्णा भाऊ साठे यांच्या आर्थिक आणि सामाजिक विचारांची प्रासंगीकता” या विषयावर संशोधन करत असताना, अण्णा भाऊ साठे यांच्या आर्थिक आणि सामाजिक विचारधारेची सद्यस्थितीत जगाला असणारी गरज आहे. त्या अनुषंगाने अण्णा भाऊ साठे यांच्या विचारधारेची प्रासंगीकता पाहणे, संशोधन करण्याची गरज भासते. संशोधन करत असताना, विचारधारेची जागतिक स्थिति तसेच भारतातील विचारप्रहाची दिशा प्राचीन ते आजतगायत स्थितिचे संशोधन करण्याची गरज भासते . अण्णा भाऊ साठे यांनी अतिशय कमी कालावधीत विपुल साहित्य निर्मिती केली आहे. ज्यामध्ये ३२ कादंबऱ्या, १६ कथा संग्रह ,१४ लोकनाट्य, ११ पोवाडे ,२ नाटक व एक प्रवास वर्णन यांचा समावेश आहे. अण्णा भाऊ साठे यांनी त्यांच्या साहित्यामध्ये आर्थिक आणि सामाजिक संघर्ष उभा केलेला आहे. अण्णा भाऊ साठे यांच्यावर कार्ल मार्क्स यांच्या आर्थिक विचारधारेचा प्रभाव त्यांच्या साहित्यात प्रखरतेने जाणवतो, कारण अण्णा भाऊ साठे यांनी मुंबईत झालेल्या गिरणी कामगाराच्या संपात सहभाग घेतला आणि भांडवलशाही व्यवस्थेचा जाहीर निषेध करून समाजातील शेतकरी, भूमिहीन शेतमजूरांचे होणारे आर्थिक शोषण,कामगार हक्क, संपतीचे विषम वाटप, असंघटित क्षेत्राचे होणारे शोषण, देशात होणारा काळा बाजार आणि दारिद्र्याचे दुष्ट चक्र मागास समाजाची आर्थिक दुर्बल अशा अनेक आर्थिक सामाजिक समस्याविरूध्द्ध लेखन करून त्यांनी समाजासमोर आणले होते.

सामाजिकदृष्ट्या उपेक्षित दलित पीडितांच्या व्यथा आणि वेदनांना परखडपणे मांडण्याची अण्णा भाऊ साठेंची कामगिरी अतिशय महत्वाची आहे. अण्णा भाऊ पूर्वकालीन लेखक दलित पीडितांच्या जीवनाकडे सहानुभूतीने बघतात, पण समाजाच्या तळागाळातून वर येऊन त्यांचे जीवन चित्रित करणारा असा कुणीही कलावंत त्यात नव्हता. यातच अण्णाभाऊ साठे यांचे वेगळेपण दिसते . आजपर्यंत अण्णा भाऊ साठे या साहित्यिकावर अनेक साहित्य कलाकृति लिहिल्या गेल्या आहेत. प्रत्येक लेखकाने आपली दिशा घेऊन अण्णा भाऊच्या जीवनाचा साहित्याचा व त्यांच्या विचारांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे . पण हे सर्व प्रयत्न एका सीमित रेषेत आहेत. या सर्वच कलाकृतीच्या माध्यमातून एका संपन्न अशा संदर्भ ग्रंथांची आवश्यकता जनतेला आहे की, ज्यातून अण्णा भाऊच्या सर्वच अष्टपैलू गुणांचे व व्यक्तिमत्वाचे दर्शन होईल. असाच एक प्रयत्न म्हणून माझा प्रबंध आहे .१६ ऑगस्ट १९४७ रोजी ते म्हणतात ये आजादी झुटी है। देश की जनता भूखी है। याचा अर्थ भारत जरी १५ आगस्त १९४७ ला स्वतंत्र झाला. तरी यावर मनुवादी विचारसरणीचा पगडा होता. देशाचे हे स्वातंत्र्य आम्हाला मान्य नाही. भारत देश स्वतंत्र झाला, परंतु या देशातील कामगार, कष्टकरी, उपेक्षित वर्ग,

शोषित वर्ग, अत्याचारीत स्रीया यांचे स्थान कुठे आहे? भांडवलशाही विरुद्ध संघर्षाचे हत्यार आणि श्रमिकांच्या हक्कांसाठी त्यांनी त्यांच्या लेखणीतून पटवून दिलेले दिसते. ‘माझी मैना गावाकडे राहिली माझ्या जिवाची होतीया काहिली’ या त्याच्या छकडीने गावकडील जनतेची व्यथा मांडलेली आहे. “अण्णा भाऊ साठे यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांची प्रासंगीकता” या माझ्या प्रबंधात आर्थिक सामाजिक विचारांची मांडणी केली आहे .

अण्णा भाऊ साठे यांचा जीवन परिचय(Introduction to the life of Anna bhau sathe) -

तुकाराम भाऊराव साठे (१ ऑगस्ट १९२०-१८ जुलै १९६९) हे अण्णा भाऊ साठे म्हणून ओळखले जाणारे एक मराठी समाजसुधारक, लोककवी आणि लेखक होते. त्यांचे लेखन आर्थिक ,सामाजिक आणि राजकीयदृष्टया कृती शिलतेवर आधारलेले होते. साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी होते. सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता. दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनास दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान महत्वपूर्ण मानले जाते. आजही मोठया संख्येने विद्यार्थी व अभ्यासक हे त्यांच्या या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात . संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम शाहीर अण्णा भाऊ साठे शाहीर अमर शेख आणि शाहीर द न गव्हाणकर यांनी केले . मुंबई ,मराठवाडा ,विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र तसेच सीमा भागातील अनेक ठिकाणी शाहीरांनी लालबावटा कलापथकाचे कार्यक्रम सादर केले .

अण्णाभाऊ साठे यांचे आर्थिक विचार(Economic Thoughts of Anna bhau sathe)-

अर्थशास्त्रातील भूमी ,श्रम ,भांडवल व संयोजन या घटकांपैकी श्रम या घटकाचे महत्व अण्णाभाऊंनी आपल्या लेखणीतून पटवून दिलेले दिसते. श्रम हा एकमेव उत्पादन प्रक्रियेतील सक्रिय घटक असल्याने त्याला उपेक्षित ठेवून चालणार नाही म्हणून त्यांनी जनजागृती चळवळ चालू ठेवली. मार्क्सवादातील वर्गसंघर्ष भाकरीचा प्रश्न महत्वाचा वाटतो.

श्रमिकाला मिळणारे काम व कामाचा मोबदला त्यांच्या योग्यतेनुसार मिळाला पाहिजे असे अण्णाभाऊंचे विचार होते. मुंबईतील कामगारांचे जीवन, त्यांचे वर्गसंघर्षाचे तत्वज्ञान, कामगारांच्या रोजिरोटीचा प्रश्न, कामगार चळवळीतील विसंवाद व त्यांच्यात पडलेली फाटाफुट या साऱ्या प्रत्यक्ष अनुभवातून अण्णाभाऊंच्या विचारांना पाठबळ मिळत गेले .

अण्णाभाऊ साठे यांनी लोकनाट्याच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक प्रश्न त्यांनी मांडले . शेटजीचे इलेक्शन,माझी मुंबई खापऱ्या चोर, देशभक्त घोटाळे या नाटकातून त्यांचे आर्थिक विचार दिसून येतात. अण्णाभाऊ साठे हे कामगारांच्या लढ्यात सक्रिय होऊन संप, सभा-संमेलनाच्या माध्यमातून त्यांनी उपेक्षित वर्गाची बाजू मांडली. कामगारांचे जीवन दुष्काळ, काळाबाजार, जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ, भ्रष्टाचार व त्यामुळे आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या ग्रामीण व नागरी भागातील लोकांना होणार त्रास, कामगारांवर कंत्राटदार मालक व भांडवलदार यांनी केलेले अत्याचार कायदा आणि सुव्यवस्थेची झालेली दैना अशा विविध आर्थिक आणि सामाजिक विचारांवर लेखन केले. भारत हा विकसनशील देश असून बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात. देशातील एकूण लोकसंख्येपैकी शेती क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण जास्त आहे, परंतु बहुसंख्य श्रमिक हे भूमिहीन शेतमजूर अल्पभूधारक यांना स्वतःच्या मालकी हक्काची जमीन मिळणे गरजेचे आहे असे अण्णाभाऊंचे मत होते. अण्णाभाऊ साठेनी लिहिलेल्या सुलतान नावाच्या कथेत सुलतानाचा विश्वास आहे की प्रत्येक माणसाला अन्न ,वस्त्र ,निवारा या गोष्टींची पूर्तता व्हायलाच पाहिजे . परंतु तो गरीब असल्यामुळे एके दिवशी स्वतःला अटक करून घेतो कारण त्याला माहीत आहे की त्याच्या गरजांची पूर्तता कारागृहात पूर्ण होऊ शकेल . सुलतान हा गुन्हेगार नव्हता परंतु त्याच्या गरजांच्या पूर्ततेसाठी त्याने जेलमध्ये राहणे पसंत केले अर्थात कारागृह हे भूक व उपासमारीचे समाधान नाही हे अण्णाभाऊ मान्य करतात.

अण्णा भाऊ साठे यांचे सामाजिक विचार(Social Thoughts of Anna Bhau Sathe) -

निर्मूल हा भेदभाव असे म्हणणारे अण्णा भाऊ साठे हे कामगार चळवळ आणि अस्पृश्यता निवारण चळवळीमधील महत्वाचा दुवा होते. १९३५-१९३६ ला कष्टकरी कामगारांचा बालेकिल्ला असलेल्या मुंबईतील माटुंगा लेबर कॅम्प येथे अस्पृश्य समाजातील तरुणांना एकत्र करून त्यांना सामाजिक चळवळीत आणण्यासाठी दलित युवक संघाची स्थापना केली होती .

'बरबादया', 'कंजारी', 'वळण', 'सापळा' अशा अनेक कथांमधून अण्णा भाऊंनी सामाजिक विषमता जातपंचायत अस्पृश्यता भेदभाव याविरोधात जनमानसात जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. अस्पृश्यता निवारण चळवळीला खऱ्या अर्थाने बळ दिले. या चळवळीत त्यांचे विचार हे समाजाला दिशा देणारे असल्यामुळेच त्यांना इ. स १९५८ मध्ये मुंबईत पार पडलेल्या दलित साहित्य संमेलनाचे अध्यक्ष पद लाभले होते . संमेलनात आपल्या भाषणात त्यांनी "पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून श्रमिक कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे". असे ऐतिहासिक विधान करत जागतिक अस्पृश्यता निवारण सभेत चळवळीला आत्मभाव तसेच आधिष्ठान प्राप्त करून दिले. अण्णा भाऊ साठे यांचे वैशिष्टे हे होते की, मुंबईतील कामगार चळवळ असो,शेतकऱ्यांची चळवळ असो,तेलंगणाच्या शेतकऱ्यांची निजामशाही असो, शेतकऱ्यांचा प्रश्न असो अण्णा भाऊ यांनी या सर्व लढ्याची दखल आपल्या गीते, पोवाडे, लोकनाट्यातून घेतली आहे .

संशोधनाची उद्‌दिष्टे (Objective of study)-

१. अण्णा भाऊ साठे यांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे .
२. अण्णा भाऊ साठे यांच्या सामाजिक विचारांचा अभ्यास करणे
३. अण्णा भाऊ साठे यांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदानाचा अभ्यास करणे
४. अण्णा भाऊ साठे यांचा भांडवलशाही विषयक विचारांचा अभ्यास करणे .

संशोधानाची गृहितके(Hypothesis of study)

१. अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यात दारिद्र्य, आर्थिक विषमता, स्थलांतर ,नागरीकरण व भांडवलशाही विचार मांडले आहेत.
२. अण्णा भाऊ साठे यांनी शिक्षण,आरोग्य, जातीव्यवस्था, गरिबीविषयक विचार मांडले आहेत.
३. अण्णा भाऊ साठे यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांची प्रासंगीकता जास्त प्रमाणात दिसून येते .
४. अण्णा भाऊ साठे यांच्या आर्थिक व सामाजिक विचारधारेला वैज्ञानिक आधिष्ठान आहे.
५. अण्णा भाऊ साठेंचे संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील योगदान अत्यंत मोलाचे आहे .

संशोधनाचे महत्त्व (Importance of the study)

आजपर्यंत आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात योगदान पाहावयास मिळते. त्याचा परामर्श घेणारे चिकित्सक सर्वस्पशी लेखन झालेले दिसून येते. कोणत्याही समाजाचा अनुबंध हा शेवटी समाजाशी असतो, कारण आर्थिक मूलाधार हा शेवटी जीवन आणि त्याचा समाज हाच असतो. समाज जीवनाला वगळून आर्थिक घडामोडी होत नसतात . समाजाचे वैचारिक मानसिक सांस्कृतिक कार्य करण्याचे कार्य आर्थिक आणि सामाजिक मूल्यातून होत असते. अण्णा भाऊ साठेंचे विचार आर्थिक व सामाजिक विचार प्रणालीशी जोडले गेलेले दिसून येतात, हा प्रबंध त्या दिशेने केलेला एक नम्र प्रयत्न आहे.

संशोधन पद्धती (Research Methodology)

प्रस्तुत संशोधनात संशोधन करण्यासाठी संशोधकाकडून ऐतिहासिक,वर्णनात्मक व विश्लेषणात्मक इ शास्त्रीय संशोधन पध्दतीचा वापर करण्यात येईल.

तथ्य संकलन स्त्रोत -

प्रस्तुत संशोधन विषयाच्या माहितीचे संकलन करण्यासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग करण्यात येईल.

दुय्यम साधन सामुग्री (Secondary Data)-

अण्णा भाऊ साठे यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांची प्रासंगीकता या विषयावरील संशोधनासाठी संदर्भग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, संशोधन अहवाल, विविध वेबसाइट ,कथा ,कादंबरी ,गीते ,पोवाडे इ साधने वापरण्यात येणार आहेत.

संशोधन विषयाची मर्यादा व व्याप्ती (Scope & Limitation of the study)-

संशोधनाची व्याप्ती अण्णा भाऊ साthen च्या लेखन प्रारंभापासून अखेरच्या लेखन ग्रंथापर्यन्त निश्चित केली आहे . १९४२ ते १९६९ अण्णा भाऊ साठे काळ, विचार, समाज कार्य या सर्व क्षेत्रात झालेला दिसून येतो .

संशोधन प्रबंधाचा संकल्पित आराखडा (A Conceptual Outline of a Research Thesis)-

प्रकरण :१

प्रस्तावना (Introduction):-

प्रस्तुत प्रकरणामध्ये अण्णा भाऊ साठे यांचे त्यांच्या लिखाणातून नाटकातून व त्यांच्या कार्यातून समाजाला कशा पद्धतीने उपयोग झाला ते अभ्यासणार आहोत.

प्रकरण :२

संशोधन पद्धती व संशोधन विकासाचा आढावा

(Review of Research Methods and research development):-

प्रस्तुत प्रकरणात संशोधन कार्यासाठी वापरण्यात येणारी संशोधन पद्धती ,संशोधन विषय निवडीचे उद्देश, संशोधन विषयाची गृहीतके,संशोधनाचे महत्व, साहित्याचा आढावा, घेण्यात येणार आहे .

प्रकरण :३

अण्णा भाऊ साठे यांचा जीवन परिचय

(Introduction to the life of Anna Bhau sathe)

प्रस्तुत प्रकरणात अण्णा भाऊ साठे यांचे बालपण ते ज्या सामाजिक व्यवस्थेत वाढले त्यांच्या जीवन कार्याचा अभ्यास करण्यात येणार आहे .

प्रकरण: ४

अण्णा भाऊ साठे यांच्या आर्थिक व सामाजिक विचारांचा अभ्यास

(A Study Of the Economic and Social Thoughts of Anna Bhau Sathe)

प्रस्तुत **प्रकरणात** अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक व सामाजिक विचारांचा अभ्यास करण्यात येईल, त्यात ग्रामीण विकास, स्थलांतर ,भांडवलशाही, प्रादेशिक विषमता, आर्थिक विषमता, नागरीकरण, कामगार चळवळ, शेतकऱ्यांच्या चळवळी, गिरणी कामगार, दारिद्रय, बेरोजगारी, अशा विविध आर्थिक व सामाजिक विचारांचा अभ्यास करणार आहोत.

प्रकरण: ५

अण्णा भाऊ साठे यांचे श्रमिकांविषयीचे विचार

(Anna Bhau Sathe's thoughts about labour):-

प्रस्तुत प्रकणामध्ये अण्णा भाऊ साठे यांचे श्रमिकांविषयीचे विचार अभ्यासणार आहोत.

प्रकरण:६

संशोधन निष्कर्ष आणि शिफारशी (Research findings and Recommendations):-

शोध प्रबंधातील शेवटचे प्रकरण निष्कर्ष व शिफारशीचे आहेत . प्रस्तुत प्रकरणात संशोधन विषयाचा सारांश, निष्कर्षाची गृहीतकांची पडताळणी आणि शिफारशी व सूचना देण्यात येणार आहेत .

(टीप - वरील संशोधन आराखडा स्थूल स्वरूपात असून प्रत्यक्ष संशोधनाची कार्य करतेवेळी त्यात बदल होण्याची शक्यता आहे.)

संदर्भ ग्रंथसूची (References):-

१ प्राध्यापक. के. एम. भोसले, प्राध्यापक. के. बी. काटे -संशोधन पद्धती

२ आगलावे प्रदीप ,'सामाजिक संशोधन पद्धती'(२००७),नागपूर , साईनाथ प्रकाशन .

३ पाटील वा. भा.' संशोधन पद्धती', (१९९८),नागपूर ,मंगेश प्रकाशन.

४ साठे अण्णा भाऊ, कंजारी, पुणे, विद्यार्थी प्रकाशन .

५ डॉ. सोमनाथ कदम ,'अण्णा भाऊ साठे साहित्य आणि तत्वज्ञान '(२०२०)पुणे ,सुगावा प्रकाशन .

६ दिनकर सहदेव साठे ,'अण्णा भाऊंच्या आठवणी '(२०१३),नागपूर ,संकेत प्रकाशन .

७ डॉ. मोहन लोंढे ,संपादक ,'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाड्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ ,ललित प्रकाशन .

८ यशवंत मनोहर ,'प्रतिभावंत साहित्यिक अण्णाभाऊ साठे ',सनद प्रकाशन .

९ प्रा. विजायकुमार जोखे,संपादक 'अण्णाभाऊ साठे चरित्र आणि कार्य ',नालंदा प्रकाशन .

१० प्रा विश्वनाथ शिंदे ,'अण्णाभाऊ साठे मानवतावादी व्यक्तिमत्व'.

११ अण्णाभाऊ साठे 'फकीरा' ,(१९६१), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई .

१२. संकटे मच्छिंद्र , अण्णाभाऊ साठे एक सत्यशोधक ,(२००५), कोल्हापूर,प्रज्ञा प्रकाशन.

१३ . साठे शंकरभाऊ :'माझा अण्णा भाऊ '(१९८४) पुणे,विद्यार्थी गृह प्रकाशन .

१४. भुयार सदाशिव,' अण्णाभाऊ साठे यांचे आर्थिक विचार'(२०१९),लातूर ,सूर्या प्रकाशन .

१५ वृत्तपत्रे

१६ www.mahamtb.com

17www.maharashtratimes.com

संशोधक विदयार्थीनी
मयुरदिदी दिलीप उफाडे

संशोधक मार्गदर्शक
प्रा. डॉ .रत्नाकर आर.कांबळे